# तरुण भारत

गुरूवार दि. ५ फेब्रुवारी २०१५


ग्रंथालय
कोरेगांव

# 'रयत'च्या चेअरमनपदी डॉ. अनिल पाटील

प्रतिनिधी
गोडोली

रयत शिक्षण संस्थेच्या चेअरमनपदी डॉ. अनिल पाटील यांची निवड करण्यात आली. संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलच्या पुणे येथे झालेल्या बैठकीत एकमताने त्यावर शिक्कामोर्तब करण्यात आले. संस्थेचे अध्यक्ष शरद पवार यांच्या झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.

ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक आणि संस्थेचे चेअरमन ॲड. रावसाहेब शिंदे यांच्या निधनामुळे रिक्त झालेल्या चेअरमनपदाची निवड करण्यासाठी संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलच्या सदस्यांची पुणे येथे बुधवारी बैठक झाली. या बैठकीस कौन्सिलचे सदस्य शंकरराव कोल्हे,



गणपतराव देशमुख, पतंगराव कदम, अजित पवार, रामशेठ ठाकूर, डॉ. अनिल पाटील यांच्यासह प्राचार्य आर. डी. गायकवाड, संजीव पाटील, सचिव प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर, सहसचिव प्राचार्य डॉ. दिनानाथ पाटील,

पान ६ पहा

# 'रयत'च्या चेअरमनपदी डॉ. अनिल पाटील

पान १ वरुन

प्राचार्य उत्तम आवारी, ऑडिटर प्राचार्य शहाजी डोंगरे, विविध विभागाचे चेअरमन व अन्य पदाधिकारी उपस्थित होते. रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांचे नातू डॉ. अनिल पाटील हे संस्थेचे सुमारे २००८ पासून व्हाईस चेअरमन म्हणून काम पाहात होते. त्यांनी १९७५ ते १९८० च्या कालावधित सातारा नगरपालिका शिक्षण मंडळाचे सदस्य म्हणून भरीव काम केले आहे. १९९० पासून संस्थेच्या कामकाजात त्यांनी सक्रिय होऊन विविध पातळीवर संस्थेच्या प्रगतीसाठी योगदान दिले आहे. १९९८ मध्ये कर्मवीर विद्याप्रबोधिनीच्या चेअरमन त्यांची निवड झाल्यानंतर त्यांनी विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीबरोबर संस्थेच्या प्रत्येक शाखेच्या सक्षमीकरणासाठी विविध प्रकल्प राबवण्यास सुरवात केली. त्याचबरोबर लायन्स क्लबचे अध्यक्ष, शिवाजी विद्यापीठ सिनेट सदस्य, तसेच अनेक संस्थांचे पदाधिकारी म्हणून त्यांनी कार्य केले आहे. सामाजिक कार्यात नेहमीच पुढाकार आणि केलेल्या उल्लेखनीय कार्यासाठी त्यांना लायन्स इंटरनॅशनलकडून बेस्ट प्रेसिडेंट म्हणून गौरवण्यात आले आहे.